**आकाशवाणी नागपूर,**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातम्या (मराठी-वेळ सायंकाळी ०६.००)**
**रविवार दिनांक १७ मे २०२६**

**ठळक बातम्या**

1. **जनगणना २०२७ अंतर्गत राज्यभरात ११ लाख १४ हजार २७७ कुटुंबांनी केली स्व गणनेची प्रक्रिया पूर्ण.**
2. **राज्यातील अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीवर कठोर कारवाई केली जाणार असल्याची महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांची माहिती.**
3. **हुंडई मोटर्स आणि VNIT नागपूर यांच्यात हुंडई सेंटर ऑफ एक्सलेन्स स्थापनेसाठी सामंजस्य करार.**
4. **पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आज 'नागपूर जलसंवाद' या राष्ट्रीय परिषदेचं आयोजन.**
5. **आज आणि उद्या अकोला, अमरावती, वर्धा या जिल्ह्यांसाठी उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट.**

**आता सविस्तर बातम्या** .......

स्व जनगणना

जनगणना २०२७ अंतर्गत स्वगणनेचा टप्पा पूर्ण झाला असून राज्यभरात ११ लाख १४ हजार २७७ कुटुंबांनी स्व गणनेची प्रक्रिया पूर्ण केली आहे. १ मे ते १५ मे दरम्यान ही प्रक्रिया राबवली गेली. पुणे, मुंबई उपनगर आणि ठाणे जिल्ह्यातल्या नागरिकांनी स्वगणनेत सर्वाधिक सहभाग नोंदवला. पुण्यात सर्वाधिक १ लाख ५३ हजार ५६८ कुटुंबांनी स्वगणनेची प्रक्रिया यशस्वीपणे पूर्ण केली. गडचिरोली जिल्ह्यात सर्वात कमी म्हणजे ३ हजार ६८८ कुटुंबांनी स्वगणना केली. तर गोंदिया जिल्ह्यात ३ हजार ८८१, आणि वर्धा जिल्ह्यात ७ हजार ६१८ कुटुंबांनी स्वगणनेची प्रक्रिया पूर्ण केली. ज्या कुटुंबांनी स्व-गणना प्रक्रिया यशस्वीरित्या पूर्ण केली आहे, त्यांनी त्यांच्या भागात येणाऱ्या प्रगणकाला 'H' या अक्षराने सुरू होणारा ११ अंकी स्व-गणना ओळख क्रमांक द्यावा, यामुळे माहिती संकलन प्रक्रिया सुरळीतपणे पूर्ण होण्यास मदत होईल, असं आवाहन प्रशासनानं केलं आहे.

चंद्रशेखर बावनकुळे

नागपूर जिल्ह्यात नियमबाह्य वाळू वाहतूक आणि वाळू चोरीच्या घटना लक्षात आल्यानंतर पोलीस आणि महसूल विभागाला तत्काळ कारवाईच्या सूचना देण्यात आल्या आहेत. राज्यातील

अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीवर कठोर कारवाई केली जाणार असल्याची माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. बावनकुळे यांनी आज नागपुरात प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना राज्यातील अवैध वाळू उत्खनन आणि वाहतुकीवर कठोर कारवाईचे संकेत दिले.

सामंजस्य करार

नवी दिल्ली इथं आयोजित कार्यक्रमात हुंडई मोटर्स आणि VNIT नागपूर यांच्यात ह्युंडाई सेंटर ऑफ एक्सलेन्स स्थापनेसाठी सामंजस्य करार करण्यात आला आहे. ह्युंडाई सेंटर ऑफ एक्सलेन्स नेटवर्कमध्ये आता भारतातील IIT दिल्ली, मुंबई, चेन्नई, कानपूर, हैदराबाद, VNIT नागपूर आणि तेजपूर विद्यापीठ या सात अग्रगण्य संस्था समाविष्ट आहेत. या उपक्रमाचा उद्देश भारतीय बाजारासाठी उपयुक्त बॅटरी आणि विद्युतीकरण तंत्रज्ञानातील संशोधन आणि विकासाला गती देणे हा आहे.

नीट पेपर फुटी प्रकरण

नीट प्रवेश परीक्षा २०२६चे पेपर फुटल्याप्रकरणी आरोपी मनिषा मांढरेला दिल्लीच्या राऊज अवेन्यू न्यायालयाने १४ दिवसांची सीबीआय कोठडी दिलीआहे. या प्रकरणाचा तपास सीबीआयने सुरु केल्यानंतर पुण्यातून आरोपीला काल अटक केली होती. नीटचा जीवशास्त्राचा पेपर फोडण्यात मांढरे प्रमुख सूत्रधार असल्याचं सीबीआयने सांगितलं.

चांदी निर्बंध

चांदीच्या आयातीवर सरकारने निर्बंध घातले आहेत. सोन्याचा किंवा प्लॅटिनमचा मुलामा लावलेल्या चांदीच्या आयातीवरही निर्बंध लावल्याचं परकीय व्यापार महासंचालनालयानं अधिसूचनेद्वारे सांगितलं. याआधी सरकारने १३ एप्रिल रोजी मौल्यवान धातूंवरचं आयात शुल्क ६ टक्क्यावरून १५ टक्क्यापर्यंत वाढवण्याचा निर्णय घेतला होता.

आकाशवाणी स्वरसंध्या

आकाशवाणी नागपुर केन्द्राव्दारे ऑल इंडिया रेडिओला 90 वर्ष पूर्ण झाल्याच्या निमीत्तान स्वरसंध्या 2026' या विशेष सुगम संगीत सभेचं आयोजन मंगळवार दिनांक 19 मेला संध्याकाळी 6.30 वाजता सायंटिफिक सभागृह, लक्ष्मीनगर इथं करण्यात आल आहे. या सभेत सुगम गायक श्याम पोहरे यांची भक्तिगीत, प्रसन्न जोशी यांचं गजल गायन तसच सुगम गायीका हेमलता पोपटकर आणि मोनिका भोयर यांची भावगीत सादर होतील. संगीतप्रेमी श्रोत्यासाठी आकाशवाणी नागपूर केंद्रातर्फे हा कार्यक्रम निःशुल्क आहे. मात्र प्रवेशपत्र

आवश्यक असून रसिकांनी त्यासाठी आकाशवाणी नागपूर केंद्राच्या सिव्हील लाईन्सस्थित कार्यालयाच्या संगीत विभागाकडून प्रवेशपत्र मिळवावीत.

‘नागपूर जलसंवाद-2026

पूर्ती सिंचन समृद्धी कल्याणकारी संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आज ‘नागपूर जलसंवाद’ या राष्ट्रीय परिषदेचं आयोजन सिव्हिल लाइन्स येथील डॉ.वसंतराव देशपांडे सभागृहात करण्यात आलं आहे. ‘शेतकरी आत्महत्यामुक्त विदर्भासाठी जलसंधारण एक उपाय’ या विषयावर ही परिषद होत असून केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री नितीन गडकरी हे या कार्यक्रमाचे अध्यक्ष आहेत.  जलसंधारणाच्या ठोस उपाययोजनांवर राष्ट्रीय स्तरावर मंथन व्हावे, हा या परिषदेचा मुख्य उद्देश आहे. राज्यभरातील शेतकरी, जलसंधारण क्षेत्रातील कार्यकर्ते, सरपंच, लोकप्रतिनि आणि अभ्यासक या परिषदेत सहभागी झाले आहेत. तर उद्या जलक्रांती परिषदेचं आयोजन रेशीमबाग येथील कविवर्य सुरेश भट सभागृहात सकाळी १० वाजता करण्यात आलं असून अभिनेते आमिर खान, नाना पाटेकर आणि मकरंद अनासपुरे यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

नक्षल मुक्त

नक्षल चळवळीचे समूळ उच्चाटन करण्यासाठी पोलिसांनी राबविलेल्या 'ऑपरेशन अंतिम प्रहार' दरम्यान ८ नक्षल्यांना अटक करण्यात आली असून, ५ नक्षल्यांनी काल पोलिसांपुढे आत्मसमर्पण केल्याने गडचिरोली जिल्हा आता पूर्णत: नक्षलमुक्त झाला आहे.अटक करण्यात आलेल्यांमध्ये कंपनी क्रमांक १० चा विभागीय समिती सदस्य राजू मंगू वेको आणि त्याची पत्नी जन्नी उर्फ नगी येमला, कंपनी सदस्य जयराम गावडे, मुकेश अवलाम, विजय तामो, रजिता मडावी, ज्योती पोटावी आणि आमती पोडियाम यांचा समावेश आहे. या सर्वांवर एकूण ६४ लाख रुपयांचे बक्षीस होते. शिवाय त्यांच्याकडून ६५ लाख ३४ हजार रुपये एवढी रोख रक्कम आणि एके-४७, एसएलआर आणि  अन्य बंदुकाही जप्त करण्यात आल्या आहेत.

‘वर्ल्ड हायपर-टेन्शन डे’

आज ‘वर्ल्ड हायपर-टेन्शन डे’, म्हणजेच, जागतिक उच्च रक्तदाब दिवस साजरा होत आहे. उच्च रक्तदाबाविषयी जागृती निर्माण करणं, रक्तदाब प्रतिबंध, निदान आणि नियंत्रणासाठी वैयक्तिक, सामूहिक आणि आरोग्य यंत्रणा स्तरावर प्रयत्नांना चालना देणं, हे या दिवसाचं उद्दिष्ट आहे.

मन कि बात - एअर

पंतप्रधान नरेंद्र मोदी आकाशवाणीच्या मन की बात कार्यक्रमातून येत्या ३१ मे रोजी रविवारी सकाळी अकरा वाजता जनतेशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३४ वा भाग असणार

आहे. या कार्यक्रमासाठी, नागरिकांना मोफत दूरध्वनी क्रमांक १८०० -११- ७८०० यावर आपले विचार आणि सूचना पाठवता येतील. तसंच, नरेंद्र मोदी ॲप आणि माय G O V  ओपन फोरम च्या माध्यमातूनही माहिती पाठवता येऊ शकते. यासह १९२२ या क्रमांकावर मिस्ड कॉल देऊन आणि त्यानंतर एस.एम.एस.वर प्राप्त लिंकद्वारेही आपल्या सूचना पाठवता येणार आहेत.

सीबीएसई

सीबीएसईने अभ्यासक्रमात तिसरी भाषा अनिवार्य केली आहे. येत्या १ जुलै पासून सुरु होणाऱ्या शैक्षणिक वर्षापासून हा नियम लागू होईल. आता नववीपासून विद्यार्थ्यांना तीन भाषा शिकाव्या लागतील, आणि त्यातल्या किमान दोन प्रादेशिक भारतीय भाषा असणं आवश्यक राहील. मात्र दहावीच्या बोर्डाच्या परीक्षेत तिसऱ्या भाषेचा पेपर नसेल असं सीबीएसईनं स्पष्ट केलं आहे.

मंत्री पंकज भोयर

यावर्षी एल निनोमुळे  पावसाचे प्रमाण कमी होणार असल्याने दुष्काळ परिस्थिती निर्माण होण्याचे संकेत आहे. त्यामुळे खरीप हंगामात शेतीसाठी पाण्याचे सुक्ष्म नियोजन करावे, असे निर्देश भंडारा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ.पंकज भोयर यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिषद कक्षात आज भोयर यांच्या अध्यक्षतेखाली खरीप हंगाम पुर्वतयारी आढावा सभा आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते दुरदृश्य प्रणालीद्वारे बोलत होते.

हवामान

विदर्भात उन्हाची तीव्रता दिवसेंदिवस वाढत असून आज आणि उद्या अकोला, अमरावती आणि वर्धा या जिल्ह्यांसाठी उष्णतेच्या लाटेचा ऑरेंज अलर्ट देण्यात आला आहे. तर नागपूर, यवतमाळ आणि चंद्रपूर इथे देखील उष्णतेच्या लाटेचा यलो इशारा देण्यात आला आहे. तर अमरावती, वर्धा, नागपूर, भंडारा, गोंदिया इथं आज विजांच्या कडकडाटासह वादळाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. दरम्यान आज दुपारी नोंदवण्यात आलेल्या तापमानानुसार अकोला इथं  45 अंश सेल्सिअस इतक्या सर्वाधिक कमाल तापमानाची नोंद करण्यात आली.  अमरावती येथे 44.8, वर्धा येथे 44.2, चंद्रपूर इथं 43.2 तर नागपूर इथं 43 अंश सेल्सिअस इतकं कमाल तापमान नोंदवण्यात आलं. दरम्यान काल अमरावती, वर्धा आणि अकोला हे जिल्हे देशात सर्वाधिक उष्ण ठरले. उन्हाच्या तीव्रतेवर शासकीय आणि संस्थात्मक पातळीवर विविध उपाय योजिले जात आहे. अकोला जिल्हा परिषद प्रशासनान कडक उन्हापासून दिलासा मिळावा यासाठी जिल्हा परिषद परिसरात हिरव्या रंगाची शेड नेट लावली आहे तर दक्षिण पूर्व मध्य रेल्वे मंडळाच्या वतीन तुमसर रोड आणि गोंदिया इथं प्रवाशांना निशुल्क ताक वितरित केलं जात आहे. दरम्यान, नैऋत्य मोसमी वाऱ्यांनी अरबी समुद्र, बंगालचा उपसागर, अंदमान समुद्राचा मोठा भाग, अंदमान द्वीपसमूह आणि

संपूर्ण निकोबार बेटांच्या काही भागांमध्ये आगेकूच केली आहे. त्यानुसार या महिन्याच्या २६ तारखेला केरळमध्ये मोसमी पाऊस दाखल होण्याची शक्यता आहे.

आयपीएल

आयपीएल क्रिकेट मध्ये आज दिल्लीच्या अरुण जेटली स्टेडीयमवर दिल्ली कॅपिटल्स आणि राजस्थान रॉयल्स यांच्यात संध्याकाळी साडेसात वाजता सामना होईल.

****